महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२१९/प्र.क्र.१९९/जाहीर सुचना-११/२०१९/२१६६ दिनांक:०३/०८/२०१९.

# जाहीर सुचना
# (एमबीए/ एमएमएस २०१९)

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यावतीने तंत्रशिक्षण विभागांतर्गत दिनांक ३० जून, २०१९ पासून एमबीए/ एमएमएस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईनपध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

तद्नंतर दिनांक १७ जुलै २०१९ रोजी उमेदवारांनी ऑनलाईनद्वारे भरलेल्या विकल्पाच्या अनुषंगाने गुणवत्तेनुसार केंद्रीभूत प्रवेश प्रकियेच्या प्रथम फेरीचे जागा वाटप करण्यात आले. या प्रक्रिये दरम्यान मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (एसटी) क्र.२०३०४/२०१९ दाखल करण्यात आली. या याचिकेच्या सुनावणीनंतर जमनालाल बजाज इंन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या संस्थेसाठी जागा वाटप करताना संस्थेचा दर्जा स्वायत्त ग्राहय धरुन महाराष्ट्र राज्यातील जागांचे राज्यस्तरीय ८५ टक्के जागा विचारात घेऊन प्रवेश करण्यात यावेत असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

या अनुषंगाने दिनांक १७ जुलै २०१९ रोजी करण्यात आलेले केंद्रीभूत प्रवेश प्रकियेच्या प्रथम फेरीचे जागा वाटप रदद् करण्यात येत आहेत. सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या सुधारीत प्रवेश प्रक्रियेसाठी नियमितपणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाला भेट दयावी व प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सुधारीत वेळापत्रकाचे अवलोकन करावे.

**सही/-**
**अध्यक्ष,**
**प्रवेश प्रक्रिया समिती तथा**
**परीक्षा समन्वयक (तंत्रशिक्षण विभाग)**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**